# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 12.03.2024** **वार–मंगळवार**

---

**मोदी रेल्वे उद्घाटन**

नवनवीन योजनांच्या माध्यमातून देशातील सर्वसामान्यांचा सातत्याने विकास होत असून आपण विकसित भारताच्या दिशेने अग्रेसर होत आहोत. असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. देशभरातील रेल्वेशी निगडीत विविध प्रकल्पांचं उद्घाटन. लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं झाली; त्यावेळी ते बोलत होते. आज उद्घाटन झालेल्या प्रकल्पांमध्ये पुण्यातील वंदे भारत कोच देखभाल दुरुस्ती कार्यशाळेसह राज्यातील एकंदर 506 प्रकल्पांचा समावेश आहे.

**यशवंतराव चव्हाण जयंती**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज त्यांना अभिवादन करण्यात आलं. कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी, यांच्यासह विविध अधिकारी विभागप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर**

मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे येत्या गुरुवारी 14 मार्चला पुण्यात विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात पंडित उल्हास कशाळकर, हृषिकेश बडवे, अनुराधा मराठे, शिल्पा दातार आपल्या गायनातून मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांना अभिवादन करणार आहेत.

**वन्यजीव**

पश्चिम घाट क्षेत्रात आढळून येणारे वन्यजीव आणि जैववैविध्याची एकत्रित माहिती देणारं वन्यजीव माहिती केंद्र वन विभागानं भीमाशंकर अभयारण्यात सुरु केलं आहे. पश्चिम घाट वनक्षेत्रात आढळून येणाऱ्या वनस्पती, फळे, फुले आणि वन्यजीवांची माहिती यात डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील बायोमायनिंग प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. या ठिकाणी 8 लाख चौरस मीटर जुन्या कचऱ्याच्या बायोमायनिंगचे 70 टक्के काम पूर्ण झालं आहे. आता दुसऱ्या टप्प्यामध्ये 15 लाख चौरस मीटर कचऱ्याचं बायोमायनिंग केलं जाणार आहे. त्यानंतर 25 एकर जागा घन कचरा व्यवस्थापनाच्या इतर प्रकल्पांकरता उपलब्ध होईल. बायोमायनिंगद्वारे पर्यावरण पुनरुज्जीवनाच्या दिशेने महापालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकलं आहे असं आयुक्त शेखर सिंह यांनी म्हटलं आहे.

**<u>शासन आपल्या दारी</u>**

भारतीय जनता पार्टी कसबा विधानसभा मतदारसंघाच्या वतीने निवडणूक प्रमुख हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून आज "शासन आपल्या दारी" हा उपक्रम राबवण्यात आला. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांच्या लाभ यावेळी नागरिकांना देण्यात आला. तीन हजारांपेक्षा जास्त नागरिकांना यामध्ये सहभाग नोंदवला.

**<u>राजीनामा</u>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी आज पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. या पुढची भूमिका लवकरच स्पष्ट करू असं मोरे यांनी सांगितलं.

**<u>अंगणवाडी</u>**

आदिवासी भगातील मुलांना शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यामधील कलागुणांना वाव मिळावा यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियानातर्गंत राज्यातील आदिवासी भागात 70 अंगणवाडया सुरू होणार आहेत. या अंगणवाडयाची देखभाल, महिला आणि बालविकास विभाग करणार आहे.

**<u>पुरस्कार</u>**

ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या काव्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पुण्याच्या विदिशा विचार मंचातर्फे यंदाचा कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज स्मृती सन्मान जाहीर करण्यात आला आहे. संस्थेच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. या पुरस्काराचं हे दुसरं वर्ष असून 29 मार्चला डहाके यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**<u>हॉकी</u>**

14 वी हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा 13 मार्चपासून पिंपरी चिंचवडच्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील 28 राज्यांचे खेळाडू सहभागी होणार आहेत. 23 मार्चपर्यंत रंगणारी ही स्पर्धा साखळी आणि बाद फेरी पद्धतीने खेळली जाणार आहे.

**<u>क्रीडा</u>**

उदगीर इथं सुरू असलेल्या खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पुण्याच्या कुस्तीपटूची आगेकूच कायम आहे. 67 किलो गटात पुण्याच्या पार्थ कंधारे याने सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. तर 61 किलो वजनी गटात अमोल वालगुडे, 74 किलो वजनी गटात अनिल कचरे, मुलींमध्ये 57 किलो वजनी गटात निर्मिती गुन्हे या पुण्याच्या मल्लांनी कास्य पदक मिळवलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 37 अंश तर किमान तापमान 16  पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तातं, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**